मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. मा.व्य/ 3306
दि. 27/08/2026
E-168046/2026

प्रति.
उप आयुक्त परिमंडळ क्र. १
उप आयुक्त परिमंडळ क्र. २
उप आयुक्त परिमंडळ क्र. ३
उप आयुक्त परिमंडळ क्र. ४
उप आयुक्त परिमंडळ क्र. ५
पुणे महानगरपालिका

यांस.......

विषय : - सन २०२६ च्या वार्षिक सार्वजनिक गणेशोत्सवाकरिता पुणे शहरामध्ये पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीमध्ये क्षेत्रीय कार्यालय निहाय गणेश मूर्ती विक्री गाळयांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ - मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/३६० दि. २५/०८/२०२६

सन २०२६ च्या वार्षिक सार्वजनिक गणेशोत्सवाकरिता पुणे शहरामध्ये पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीमध्ये क्षेत्रीय कार्यालय निहाय गणेश मूर्ती विक्री गाळयांना क्षेत्रीय कार्यालय स्तरावर १ खिडकी योजना राबवून भाडे रक्कम व अनामत रक्कम स्वीकारून परवानगी देणेस मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भीय ठरावान्वये मान्यता दिली आहे. सदर मान्यतेच्या व भाडे रक्कम, अनामत रक्कम तपशिलासह जागांची यादी सोबत जोडली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालय स्तरावर १ खिडकी कक्ष स्थापन करून कार्यवाही करण्यात यावी.

सदर बाबत खालील प्रमाणे बजेट हेड वर रक्कम जमा करावी.

१. भाडे व सफाई शुल्क - **R122A101**

२. अनामत रक्कम - **S125A126**

(प्रशांत ठोंबरे)
उप आयुक्त
मालमत्ता व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

सोबत - मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेची प्रत व
भाडे रक्कम, अनामत रक्कम तपशिलासह जागांची यादी व कार्यपद्धती

# पुणे महानगरपालिका

## मालमत्ता व व्यवस्थापन विभाग

सालाबादप्रमाणे पुणे शहरात साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव करिता पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीमध्ये क्षेत्रीय कार्यालय निहाय श्री गणेशमूर्ती विक्री गाळ्यांना तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीबाबत

**<u>जाहीर आवाहन</u>**

सालाबादप्रमाणे यावर्षी साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना व मंडळांना श्री गणेशमूर्ती विकत घेण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत श्री गणेशमूर्तीचे गाळे उभारण्यास रस्ता व पदपथावर परवानगी देण्यात येणार नसून, पुणे महानगरपालिकेच्या मोकळ्या बांधीव जागांवर, मैदान, पटांगणे इ. जागांवर श्री गणेशमूर्ती विक्री करणे करिता परवानगी देण्यात येणार आहे. त्यानुसार या वर्षी श्री गणेशमूर्ती विक्री करणेसाठी सर्व श्री गणेशमूर्ती विक्रेत्यांना आवाहन करण्यात येत आहे.

ऑफलाईन पद्धतीने अग्रक्रमानुसार येणाऱ्यास प्राधान्य अशा पद्धतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच या बाबतची सर्व कार्यपद्धती मनपा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने २०२६ या वर्षासाठी पुणे महानगरपालिका हद्दीत क्षेत्रीय कार्यालय निहाय १५' x १०' मापाचे गणपती गाळे विक्रीसाठी एकूण २३ जागा निश्चीत केल्या आहेत. त्याची यादी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. श्री गणेशमूर्ती स्टॉल उभारणेची मुदत दि. ०५/०९/२०२६ ते दि. १४/०९/२०२६ अशी राहील. श्री गणेशमूर्ती गाळे विक्री बाबतची कार्यपद्धती पुणे मनपाच्या EOI या शिर्षाखाली प्रसिद्ध केलेली आहे.

**<u>श्री गणेशमूर्ती गाळे विक्री बाबतची कार्यपद्धती</u>**

१. पुणे मनपा मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत भाडे कराराने जागा उपलब्ध करून देण्यात येणार असून गणेशमूर्ती विक्रीसाठी आवश्यक पोलीस परवानगी व इतर सर्व कायदेशीर परवानग्या घेण्याची व त्याप्रमाणे पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित स्टॉलधारकाची राहील.

२. नमुना 'अ' नुसार अर्ज भरून ऑफलाईनद्वारे सादर करावे.

३. अर्जासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, संपर्क क्रमांक, बँक पासबुकची झेरॉक्स स्कॅन करून जोडावे.

४. अनामत र.रु.१००००/- पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑनलाईन/डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे जमा करावे अथवा ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करावे.

५. अर्जाच्या छाननी नंतर पात्र गाळेधारकांना १० दिवसांचे विहित भाडे पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑनलाईन/डेबिट कार्ड/ क्रेडीट कार्ड द्वारे जमा करावे अथवा ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करावे.

६. पुणे मनपा कडून फक्त मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात येईल, स्टॉलचे तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम पात्र गाळेधारकांना स्वतः स्वखर्चाने करावयाचे आहे.

७. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये सर्व बाबींचे पालन करणे बंधनकारक राहील.

बंधनकारक राहील.

८. साथ प्रतिबंधक अधिनियम १८९७ अन्वये सर्व बाबींचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. मे. महाराष्ट्र शासनाकडील व मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांनी वेळोवेळी जाहीर केलेले आदेश बंधनकारक राहतील.

१०. गणेश मूर्ती विक्रीची वेळ मे. शासनाने व पुणे महापालिकेने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार असेल.

११. विक्री स्टॉल मधील कर्मचाऱ्यामध्ये कोणत्याही आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घेऊन कार्यवाही करणे.

१२. नागरिकांना मूर्ती घेण्यासाठी सुरक्षित अंतर ठेवणेकरीता स्टॉल धारकांनी बांबूचे रेलिंग, बॅरेकेटींग आवश्यक राहील.

१३. अग्निशमन विभाग यांचेकडील अटी शर्तीची पूर्तता करणेकरीता नजीक असलेल्या अग्निशमन केंद्र प्रमुखास जागा दाखवून त्यांचे सूचनेनुसार अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी. अशा ठिकाणांवर कोणताही अपघात, हानी व दुखापत झाल्यास तसेच शेजारील इमारतीस अगर मालमत्तेस धोका पोहोचल्यास त्याची सर्व जबाबदारी गाळेधारकांची राहील. याबाबत पुणे मनपास कोणतीही तोषीस असणार नाही.

१४. गाळे उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता करणेची / राखणेची जबाबदारी सर्व गाळेधारकांची राहील. संबंधित आरोग्य निरीक्षकास अस्वच्छता आढळल्यास दंडात्मक कारवाई करूनअनामत रकमेमधून सदर दंडाची रक्कम वजा करून घेण्यात येईल.

१५. स्टॉल विक्रीची मुदत संपल्यानंतर ३ दिवसांचे आंत स्वखर्चाने सदरच्या तात्पुरत्या स्वरूपातील गाळ्यांचे बांधकाम जागेवरून ताबडतोब हटवून जागा स्वच्छ करून रिकामी करून द्यावी लागेल. तसेच सदरच्या जागेचे कोणतेही नुकसान झालेले नाही याची खात्री गाळेधारकाने करून देणे आवश्यक राहील.

१६. परवानगी दिलेल्या जागेची पुणे महानगरपालिकेस जरुरी भासल्यास अथवा त्या जागेबाबत वाद विवाद निर्माण झाल्यास सदर देण्यात आलेली अधिकृत परवानगी २४ तासाची पूर्वसूचना देऊन रद्द करण्याचा महापालिकेस हक्क राहील.

१७. सदर विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन संबंधित विक्रेत्यांवर बंधनकारक राहील.

१८. श्री गणेश मूर्तींची सुरक्षितता व आवश्यक दक्षता घेण्याची व पावित्र्य जपण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विक्रेत्यांवर राहील.

१९. या उत्सवादरम्यान विक्री झाली नाही अशा श्री गणेश मूर्तींच्या संदर्भात योग्य पद्धतीने त्या ठिकाणाहून विक्रेत्यांच्या सोयीच्या ठिकाणी काळजीपूर्वक घेऊन जाण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विक्रेत्यांची राहील.

(प्रशांत ठोंबरे)
उप आयुक्त
मालमत्ता व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

# पुणे महानगरपालिका

## मालमत्ता व व्यवस्थापन विभाग

सालाबादप्रमाणे पुणे शहरात साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाकरिता पुणे शहरामध्ये महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीमध्ये क्षेत्रीय कार्यालय निहाय श्रीगणेश मूर्ती विक्री गाळ्यांना तात्पुरत्या स्वरूपात परवानगी देण्याच्या कार्यपद्धतीबाबत

जाहीर आवाहन

सालाबादप्रमाणे यावर्षी साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांना व मंडळांना श्रीगणेश मूर्ती विकत घेण्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

सद्य:स्थितीत श्रीगणेश मूर्ती विक्रीचे गाळे उभारण्यास रस्ता व पदपथावर परवानगी देण्यात येणार नसून, पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मोकळया बांधीव जागांवर, मैदान, पटांगणे इ. जागांवर श्रीगणेश मूर्ती विक्री करणेकरिता परवानगी देण्यात येणार आहे. त्यानुसार या वर्षी श्रीगणेश मूर्ती विक्री करणेसाठी सर्व श्रीगणेश मूर्ती विक्रेत्यांना आवाहन करण्यात येत आहे.

ऑफलाईन पद्धतीने अग्रक्रमानुसार येणा-यास प्राधान्य अशा पद्धतीने कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच या बाबतची सर्व कार्यपद्धती म.न.पा. संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार मालमत्ता व व्यवस्थापन विभागाने २०२६ या वर्षासाठी पुणे महानगरपालिका हद्दीत क्षेत्रीय कार्यालयनिहाय १५' x १०' मापाचे गणपती गाळे विक्रीसाठी एकूण २३ जागा निश्चित केल्या आहेत. त्याची यादी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. श्रीगणेश मूर्ती स्टॉल उभारणेची मुदत दि. ०५/०९/२०२६ पासून ते दि. १४/०९/२०२६ अशी राहील. श्रीगणेश मूर्ती गाळे विक्रीबाबतची कार्यपद्धती पुणे मनपाच्या EOI व जाहीर आवाहन या शीर्षाखाली प्रसिद्ध केलेली आहे.

(प्रशांत ठोंबरे)
उप आयुक्त
मालमत्ता व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

सन २०२६ या वर्षासाठी गणेशोत्सवानिमित्त गणेशमूर्ती विक्रीसाठी निश्चित केलेल्या जागची यादी.

| अ क्र. | अर्ज स्विकृती क्षेत्रिय कार्यालयाचे नाव (एक खिडकी) | पुणे मनपा गणेशमूर्ती स्टॉल नियोजित जागा | नियोजित स्टॉल संख्या | सम्बन्धित कनिष्ठ अभियन्ता |
|---|---|---|---|---|
| १ | औंध बाणेर क्षेत्रिय कार्यालय | बालेवाडी स.नं. १७, प्ले-ग्राउंड | १० | |
| २ | कोंढवा -येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय | कोंढवा खुर्द स.नं.४ पार्क आरक्षणापैकी जागा (फायर स्टेशनच्या मागील) | ०५ | |
| ३ | हडपसर - मुंडवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर स.नं. १५७, १५८ १६१ येथिल हायस्कूल आरक्षित जागा सी.टी.एस. १६५६ | ३५ | |
| ४ | हडपसर - मुंडवा क्षेत्रिय कार्यालय | हडपसर स.नं. १३७, मोहन धारिया उद्यान समोरी प्ले ग्राउंड, हडपसर मुंढवा रस्ता | ०५ | |
| ५ | येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रिय कार्यालय | धानोरी स.नं. १६/३ ची ॲमेनिटी स्पेस जागा | ०५ | |
| ६ | येरवडा-कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालय | धानोरी स.नं. १७ पैकी जुना जकात नाका जागा | २५ | |
| ७ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय | कोथरूड स.नं.५४/४, ओटा मार्केट आरक्षणापैकी जागा | ०५ | क्षेत्रिय कार्यालयात विचारणा केली असता सदर ठिकाणी स्टॉल लागत नसल्याचे सांगण्यात आले |
| ८ | कोथरूड बावधन क्षेत्रिय कार्यालय | बावधन स्वामी विवेकानंद शाळा | १५ | |
| ९ | कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालय | कोथरूड स.नं. ९४ व ९५, सावरकर मैदान | २० | |
| १० | धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | पर्वती स.नं. ९३ सहयाद्री मैदान, लक्ष्मीनगर | ०५ | |
| ११ | धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय | कात्रज स.न. ७३ प्रायमरी स्कूल करीता आरक्षित २८०० चौ.मी. जागा | २५ | |
| १२ | बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय | लोवर इंदिरा नगर, स.नं. ६७०, ६७१ बिबवेवाडी पोलीस स्टेशन मागील शाळा | १५ | |
| १३ | सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय | धायरी स.नं. १४४/४, यशवंत बिहार सोसायटी, धायरी, ॲमेनिटी स्पेस | ०५ | |
| १४ | सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय | वडगाव बु।। स.नं. १२, ओटा मार्केट | ०८ | क्षेत्रिय कार्यालयात विचारणा केली असता सदर ठिकाणी स्टॉल लागत नसल्याचे सांगण्यात आले |
| १५ | सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालय | वडगाव बु।। स.नं. ४/२ ब | १० | |
| १६ | नगर रोड वडगाव शेरी क्षेत्रिय कार्यालय | लोहगाव स.नं. २८४/७/१, २, ३, ४, ५, ६ | १० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | नगर रोड वडगाव शेरी क्षेत्रिय कार्यालय | खराडी स.नं. १२, मैदान | ४० | [signature] |
| १८ | नगर रोड वडगाव शेरी क्षेत्रिय कार्यालय | लोहगाव स.नं. २७६/१/१ | १५ | [signature] |
| १९ | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | एरंडवणा फा. प्लॉट क्र. २४, साठे हॉस्पिटल समोर | १० | [signature] |
| २० | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | स.नं. ११२, शारदा मोहेला प्रशिक्षण केंद्राची जागा पार्किंग मध्ये | ०३ | [signature] |
| २१ | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | वारजे स.नं. १११/१ | ०४ | [signature] |
| २२ | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | वारजे स.नं. ८६/५/१ | ०८ | [signature] |
| २३ | घोले रोड क्षेत्रिय कार्यालय | शिवाजी व्यायाम मंडळ | १० | [signature] |
| २४ | घोले रोड क्षेत्रिय कार्यालय | तुकाराम ओंबाळे मैदान, गोखलेनगर | १० | |
| २५ | घोले रोड क्षेत्रिय कार्यालय | पं. जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन | ०५ | [signature] |
| | | एकूण | ३०८ | |

# गणेशमूर्ती विक्रीकरिता मोकळी जागा

## नमुना 'अ' प्रमाणपत्र

मी अर्जदार, ----------------------------------------------------------------------- प्रमाणित करतो/करते की,

१. पुणे मनपा मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत भाडे कराराने जागा उपलब्ध करून देण्यात येणार असून गणेशमूर्ती विक्रीसाठी आवश्यक पोलीस परवानगी व इतर सर्व कायदेशीर परवानग्या घेण्याची व त्याप्रमाणे पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित स्टॉलधारकाची राहील.

२. नमुना 'अ' नुसार अर्ज भरून ऑफलाईनद्वारे सादर करावे.

३. अर्जासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, संपर्क क्रमांक, बँक पासबुकची झेरॉक्स स्कॅन करून जोडावे.

४. अनामत र.रु.१००००/- पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑनलाईन/डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे जमा करावे अथवा ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करावे.

५. अर्जाच्या छाननी नंतर पात्र गाळेधारकांना १० दिवसांचे विहित भाडे पुणे मनपाच्या अकाऊंटवर ऑनलाईन/डेबिट कार्ड/ क्रेडीट कार्ड द्वारे जमा करावे अथवा ऑफलाईन पद्धतीने क्षेत्रीय कार्यालयात जमा करावे.

६. पुणे मनपा कडून फक्त मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात येईल, स्टॉलचे तात्पुरत्या स्वरूपाचे बांधकाम पात्र गाळेधारकांना स्वतः स्वखर्चाने करावयाचे आहे.

७. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये सर्व बाबींचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. साथ प्रतिबंधक अधिनियम १८९७ अन्वये सर्व बाबींचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. मे. महाराष्ट्र शासनाकडील व मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांनी वेळोवेळी जाहीर केलेले आदेश बंधनकारक राहतील.

१०. गणेश मूर्ती विक्रीची वेळ मे. शासनाने व पुणे महापालिकेने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार असेल.

११. विक्री स्टॉल मधील कर्मचाऱ्यामध्ये कोणत्याही आजाराची लक्षणे दिसल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घेऊन कार्यवाही करणे.

१२. नागरिकांना मूर्ती घेण्यासाठी सुरक्षित अंतर ठेवणेकरीता स्टॉल धारकांनी बांबूचे रेलिंग, बॅरेकेटींग आवश्यक राहील.

१३. अग्निशमन विभाग यांचेकडील अटी शर्तीची पूर्तता करणेकरीता नजीक असलेल्या अग्निशमन केंद्र प्रमुखास जागा दाखवून त्यांचे सूचनेनुसार अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी. अशा ठिकाणांवर कोणताही अपघात, हानी व दुखापत झाल्यास तसेच शेजारील इमारतीस अगर मालमत्तेस धोका पोहोचल्यास त्याची सर्व जबाबदारी गाळेधारकांची राहील. याबाबत पुणे मनपास कोणतीही तोषीस असणार नाही.

१४. गाळे उभारण्यात आलेल्या परिसराची स्वच्छता करणेची / राखणेची जबाबदारी सर्व गाळेधारकांची राहील. संबंधित आरोग्य निरीक्षकास अस्वच्छता आढळल्यास दंडात्मक कारवाई करूनअनामत रकमेमधून सदर दंडाची रक्कम वजा करून घेण्यात येईल.

१५. स्टॉल विक्रीची मुदत संपल्यानंतर ३ दिवसांचे आंत स्वखर्चाने सदरच्या तात्पुरत्या स्वरूपातील गाळ्यांचे बांधकाम जागेवरून ताबडतोब हटवून जागा स्वच्छ करून रिकामी करून द्यावी लागेल. तसेच सदरच्या जागेचे कोणतेही नुकसान झालेले नाही याची खात्री गाळेधारकाने करून देणे आवश्यक राहील.

१६. परवानगी दिलेल्या जागेची पुणे महानगरपालिकेस जरुरी भासल्यास अथवा त्या जागेबाबत वाद विवाद निर्माण झाल्यास सदर देण्यात आलेली अधिकृत परवानगी २४ तासाची पूर्वसूचना देऊन रद्द करण्याचा महापालिकेस हक्क राहील.

१७. सदर विषयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे पालन संबंधित विक्रेत्यांवर बंधनकारक राहील.

१८. श्री गणेश मूर्तीची सुरक्षितता व आवश्यक दक्षता घेण्याची व पावित्र्य जपण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विक्रेत्यांवर राहील.

१९. या उत्सवादरम्यान विक्री झाली नाही अशा श्री गणेश मूर्तीच्या संदर्भात योग्य पद्धतीने त्या ठिकाणाहून विक्रेत्यांच्या सोयीच्या ठिकाणी काळजीपूर्वक घेऊन जाण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विक्रेत्यांची राहील.

गणेशमूर्ती विक्रीकरिता दिलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील परवानगी मध्ये नमूद केलेल्या उपरोक्त सर्व अटी मी वाचल्या असून त्या मला संपूर्ण समजल्या असून मला मान्य आहेत.

(स्वाक्षरी)

अर्जदाराचे नाव :-

पत्ता :-

दिनांक :-

मो. क्र.